# जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

## ( ग्रामपंचायत निवडणुक विभाग )

**वाचा-** १ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम ५७, ६४ आणि ६७.

२. मा.सचिव राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्रं.रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८ /का.७ नवीन प्रशासन भवन, यांचे पत्र दिनांक १३.०१.२०२६ व सुधारीत कार्यक्रम दिनांक २९.०१.२०२६

३. महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्रमांक/२०२६/जिपपंस/निवडणूक/कावि- दिनांक ११/०२/२०२६

४. अवर सचिव, ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक/जिपनि-२०२६ /प्र.क्र.२५पं.रा२ दिनांक २५/०२/२०२६

जा.क्रं२०२६/जिपपंस/निवडणूक/कावी- दिनांक-२६/०२/२०२६

ज्याअर्थी, लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती व उपसभापतींची मुदत सन २०२२ मध्ये संपलेली आहे. पंचायत समिती सभापती पदाचे हे आरक्षण हे दिनांक १३.१०.२०२५ रोजी निश्चीत केले आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाने संदर्भ क्र. २ मधील निश्चित केलेनुसार लातूर जिल्हा परिषदेची निवडणूक प्रक्रिया पार पडलेली आहे. संदर्भ क्र. ३ अन्वये लातूर जिल्ह्यातील पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम ६७ मधील तरतुदीनुसार पंचायत समिती सभापती व उपसभापती यांच्या निवडीसाठी सदर अधिनियमाच्या कलम ५९(३) नुसार निश्चित करील अशा तारखेला एक सभा बोलाविण्याची तरतुद आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त क्र. ४ वरील नमुद शासन पत्रान्वये लातूर जिल्ह्यातील पंचायत समित्यांची पहिली बैठक दिनांक २०.०३.२०२६ पुर्वी आयोजीत करावे असे कळविले आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम ५९(३) व ६७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हाधिकारी लातूर याद्वारे लातूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या सभापती व उपसभापती निवडीची प्रथम सभा **दिनांक ०९ मार्च २०२६ रोजी** आयोजीत करणेसाठी खालील दर्शविलेल्या अधिकारी यांना पिठासीन अधिकारी म्हणून प्राधिकृत करीत आहे. सदरील सभेमध्ये सभापती यांचे निश्चीत केलेल्या आरक्षणनुसार निवडणूक घेणे व त्यानंतर उपसभापती यांची निवडणूक घेण्यात यावी.

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | पिठासीन अधिकारी यांचे पदनाम | सभापती पदाच्या आरक्षणाचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | औसा | उपविभागीय अधिकारी औसा-रेणापूर | अनुसूचित जाती |
| २ | निलंगा | उपविभागीय अधिकारी निलंगा | अनुसूचित जाती (महिला) |
| ३ | लातूर | उपविभागीय अधिकारी लातूर | नागरिकाचा मागास प्रवर्ग |
| ४ | उदगीर | उपविभागीय अधिकारी उदगीर | नागरिकाचा मागास प्रवर्ग (महिला) |

# जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर

## ( ग्रामपंचायत निवडणुक विभाग )

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | चाकूर | तहसिलदार चाकूर | नागरिकाचा मागास प्रवर्ग (महिला) |
| ६ | देवणी | तहसिलदार देवणी | सर्वसाधारण |
| ७ | अहमदपूर | उपविभागीय अधिकारी अहमदपूर | सर्वसाधारण |
| ८ | शिरूरअनंतपाळ | तहसिलदार शिरूर अनंतपाळ | सर्वसाधारण |
| ९ | जळकोट | तहसिलदार जळकोट | सर्वसाधारण (महिला) |
| १० | रेणापूर | तहसिलदार रेणापूर | सर्वसाधारण (महिला) |

उपरोक्त नमुद पीठासीन अधिकारी यांनी **दिनांक ०९/०३/२०२६ वेळः दुपारी- ०२.०० वाजता** उक्त नमुद पंचायत समिती सभागृहात सभापती व उपसभापती निवडीसाठी सदस्यांची विशेष बैठक आयोजित करावी. प्राधिकृत पिठासीन अधिकारी यांनी पंचायत समिती सभापती व उपसभापती पदाची निवड करताना खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ व महाराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष / उपाध्यक्ष व विशेष समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या (सभापती / उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम १९६२ मधील अद्यावत तरतुदीचे काटेकोर पालन करावे.

२. अधिनियमाचे कलम ११८-ड(१) प्रमाणे नोटीस विशेष दुताकरवी संबंधीत निर्वाचित सदस्यास बजावाव्यात. अधिकची खबरदारी म्हणून पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती निवडणुकीबाबत वर्तमान पत्रातही प्रसिध्दी द्यावी व या बैठकीस उपलब्ध प्रसार व प्रचार माध्यामातूनही उचित प्रसिध्दी द्यावी. पंचायत समितीच्या प्रथम सभेची नोटीस बजावल्याची पोहोच कार्यालयीन दप्तरी ठेवावी.

३. पिठासीन अधिकारी यांनी बैठक पंचायत समिती सभागृहात आयोजित करावी.

४. पंचायत समिती निर्वाचक गणातुन निवडून आलेल्या सदस्यांना सदर निवडणूक लढविता येईल व त्यांना मतदान करता येईल.

५. पंचायत समिती सभापती व उपसभापती पदाच्या निवडणूकीसाठी पिठासीन अधिकारी यांचे नमुना-अ (पंचायत समिती सभांच्या कामकाजाचे नियम १९६५ चे नियम ५ नुसार) प्रमाणे नोटीस द्यावी.

६. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ व महराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष / उपाध्यक्ष व विशेष समित्यांचे सभापती) आणि पंचायत समित्या ( सभापती / उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम १९६२ (३) व (८) प्रमाणे सभापती व उपसभापती पदाचे नामांकन पत्र सभेच्या वेळेच्या पुर्वी दोन तास आगोदर स्विकारावित.

७. उक्त अधिनियमाचे कलम ११८ प्रमाणे सभेची गणपुर्ती, एकूण पंचायत समिती सदस्यांच्या १/३ असणे आंवश्यक आहे.

८. निवडणूकीशी संबंधीत इतर अनुषंगीक बाबींचे बारकाईने पालन करण्यात यावे.

९. बैठकीचा कार्यवृत्तांत वेळीच सादर करावा.

वर्षा ठाकूर-घुगे (भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी लातूर

**प्रतिलिपी -**

१. मा. सचिव, ग्राम विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग नविन प्रशासकीय इमारत मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.लातूर.
५. उपविभागीय अधिकारी (लातूर, औसा-रेणापूर.अहमदपुर, उदगीर, निलंगा)
६. तहसीलदार (सर्व), जि.लातूर
७. गटविकास अधिकारी पं.स. (सर्व), जि.लातूर

-sd-
जिल्हाधिकारी लातूर